नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०६/२०२५ (शुक्रवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात बकरी ईद निमित्य लावण्यात आला कडेकोट बंदोबस्त,तसेच बारकाईने सोशल मिडीयावर ठेवले जात आहे सतत लक्ष

दिनांक ०७/०६/२०२५ रोजी बकरी ईद (ईद —उल—अजहा) असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.सदर बंदोबस्तात नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी हे आपआपल्या उपविभागाात नेमुन दिलेल्या स्ट्रायकींग फोर्स सहीत कडक पेट्रोलीग करतील तसेच सर्व ठाणे प्रभारी अधिकारी आणि त्यांचे अधिनिस्त अधिकारी/अंमलदार यांनी त्यांना नेमुन दिलेले कर्तव्य काटेकोरपणे बजावणे बाबत मा.पोलीस अधीक्षकांनी सुचना दिल्या आहेत. जिल्हा विशेष शाखा नागपुर ग्रामीण आणि सर्व २२ पोलीस स्टेशन यांनी योग्य बंदोबस्त लावला असुन बंदोबस्तासाठी होमगार्ड— ६०० पुरूष आणि १०० महीला असे अतिरिक्त मनुष्य बळ मागविण्यात आले आहे. सहा उपविभागात ६ विभागीय पेट्रोलींग पथक नेमण्यात आलेले आहे. दंगा नियंत्रण पथक यांचा बंदोबस्तामध्ये समावेश आहे. विशेष ठिकाणी फिक्स पॉईट लावण्यात आलेले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस बारकाईने सोशलमिडीया वर लक्ष ठेवुन सतत मॉनिटरींग करीत आहे. सोशमिडीयावर कोणत्याही धर्माच्या/ जातीच्या/समुदायाच्या धार्मिक भावना दुखावतील तसेच जातीय तेढ निर्माण होईल अशा प्रकारचे पोस्ट, स्टेटस ठेवु नये किंवा अशा प्रकार चे कृत्य करू नये तसेच जतीय सलोखा ठेवुन शांततेत सणोत्सव साजरा करण्या बाबत आवाहन नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे नागरिकांना करण्यात**

**येत आहे. धार्मिक भावना दुखावतील तसेच जातीय तेढ निर्माण होईल अशा प्रकार चे कृत्य करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे नोंद करण्यात येणार आहे.**

## सेक्स रॅकेट मध्ये फसविण्याची धमकी देवुन पैशाची मागणी करून आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या, ६ महीन्यापासुन मिळुन येत नसलेल्या आरोपीचा घेतला शोध रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक :—** दिनांक १०/१२/२०२४ रोजी अल्पवयीन मृतक याने गळफास घेतल्याने पोस्टे रामटेक येथे मर्ग दाखल होता. दिनांक १२/१२/२०२४ रोजी मृतकाचे वडील यांनी फिर्यादी दिली की मृतकाला मो क.१) ९८२०६१७०८२ २) ८४३४३९१७४१ धारकांनी फोन वरून सेक्स रॅकेट मध्ये फसविण्याची धमकी देवुन ५०००/— रू चे मागणी करत दबाव टाकुन करून पैसे न दिल्यास बदनामी करण्याची भीती दाखवीली त्याने पैसेची मागणी चे भिती मुळे तसेच बदनामी होईल या मुळे दिनांक १०/१२/२०२४ रोजी मृतकाने गळफास लावुन आत्महत्या केली आहे करीता फिर्यादीचे रिपोर्ट वरून अज्ञात मो क्र १) ९८२०६१७०८२ २) ८४३४३९१७४१ धारकांवर पोस्टे रामटेक येथे कलम १०७ , ३०८(३),३(५) बी एन एस **(आत्महत्येस प्रवृत्त करणे) असा गुन्हा नोंद आहे.**

सदर गुन्हयाचा तपास रामटेक पोलसांनी सुरू केला असता पोलीसांनी दिनांक २२/१२/२०२४ रोजी ओमप्रकाश प्रसाद दुलारचंद महतो, वय ३५ वर्षे, रा बिच टोला, ग्राम बरवां,थाना बरहठठा जि. हजारीबाग राज्य झारखंड याला अटक केली होती. परंतु यातील **पाहीजे आरोपी नामे तापेश्वर प्रसाद दुलारचंद महतो रा. बरमा ता. बरही जि. हजारीबाग (झारखंड)हा मिळुन येत नव्हता. रामटेक पोलीसांनी गुप्तबामीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सखोल तपास केला असता नमुद आरोपी हा झारखंड येथे त्याच्या राहत्या घरी असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीस पथक तात्काळ झारखंड येथे रावाना झाले आणि दिनांक ०६/०६/२०२५ रोजी आरोपी नामे तापेश्वर प्रसाद दुलारचंद महतो, वय २५ वर्षे ,रा. बरमा ता. बरही जि. हजारीबाग (झारखंड) याला त्याचे राहते घरून बरमा ता. बरही जि. हजारीबाग (झारखंड) येथुन ताब्यात घेतले आहे.**

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद
# ५० लाख ७० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
# भिवापुर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापुर :— **दिनांक ०५/०६/२०२५** रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भिवापुर पोलीसांनी नाकाबंदी करून खालील प्रमाणे कारवाई केली.

कारवाई कं १:— पोलीसांनी चिचाळा फाटा येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान ट्रक क्र.एम एच ४० सी टी ९२४१ हे वाहन मिळुन आले. त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक जावेद हमीद खॉन, वय ४० वर्षे, रा.हुडकेश्वर, जि नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. अधिक विचारपुस केली असता **वाहन मालक नासीर हसीम खॉन रा. खरबी जि. नागपुर** याच्या सांगण्यावरून अवैध्यरित्या रेतीची वाहतुक केली जात आहे अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ८ ब्रास रेती किंमती ४०,००० /— रूपये आणि २) ट्रक क्र.एम एच ४० सी टी ९२४१ किंमती ३०,००,०००/— रूपये असा एकुण ३०,४०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

कारवाई कं २ :— पोलीसांना पोस्टे टी पॉईंट भिवापुर येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान ट्रक क्र एम.एच ४० ए टी ६०९० हे वाहन मिळुन आले . वाहन थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली . वाहन चालक **बशीर अब्दुल शेख, वय ३८ वर्षे, रा. दुरखेडा, ता. उमरेड जि. नागपुर** हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. अधिक विचारपुस केली असता **वाहन मालक प्रणय विलास धनविजय रा. कावळापेठ, ता. उमरेड जि. नागपुर** याच्या सांगण्यावरून अवैध्यरित्या रेती ची वाहतुक करीत असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष नमुद वाहनामधुन १) ६ ब्रास रेती ३००००/— रूपये २) ट्रक क्र एम.एच ४० ए टी ६०९० किंमती २०,००,०००/— रूपये असा एकुण २०,३०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

**दोन्ही कारवाईत दोन वाहन आणि १४ ब्रास रेती असा एकुण ५०,७०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद वाहन चालक आणि मालक आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम, सह कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. ,सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये **२ गुन्हे** दाखल करण्यात आले आहे. **नमुद गुन्हयातील चालक आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

## कत्तलीसाठी बांधुन ठेवलेल्या गोवंश जनावरांची सुटका ,आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०५/०६/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, होळी चौक, सावनेर येथे कत्तलीसाठी गोवंश जनावरे बांधुन ठेवली आहे. अशी माहीती मिळताच सावनेर पोलीस तात्काळ घटनास्थळी गेले असता होळी चौक येथे २ गोवंश जनावरे उन्हात चारापाण्याची सोय न करता बांधुन ठेवलेले मिळुन आले. पोलीसांनी सदर बाबतीत विचारपुस केली असता एक इसम ही जनावरे संशयीत रित्या घेवुन जात असता स्थानिकांनी त्याची विचारपुस केली असता नमुद इसम जनावारांना बांधुन पळुन गेल्याची माहीती पोलीसांना मिळाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून २ गोवंश जनावरांना ताब्यात घेवुन जनावरांना पालन पोषणाच्या दृष्टीकोणातुन कवठा, ता. सावनेर येथील मालु गोशाळेत दाखल करण्यात आले आहे.**

**अज्ञात आरोपी विरूध्द कलम ५ (ए) ,९ महा. पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# चोरीचा गुन्हा उघड ,एम.आय.डी.सी. बोरी पोलीसांची कामगिरी

**पोस्टे एमआयडीसी बोरी:—** पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे फिर्यादी नामे अनिल रामदास जाधव (सिग्मा कंपनी मालक), रा. वर्धा रोड, बुटीबोरी यांनी तक्रार दिली की, सिग्मा कंपनीचे खुल्या आवारात दिनांक १८/०५/२०२५ चे रात्री ०३:०० ते ०४:०० चे दरम्यान कंपनीचे लोखंडी प्लेट किंमती ८,०००/— मुद्देमाल चोरीस गेल्याचे रिपोर्ट वरून अप क्र. २६१/२०२५ कलम ३०३ (२) ,३(५) भान्यासं असा चोरीच गुन्हा नोंद आहे.

नमुद दाखल चोरीच्या गुन्हयांचा तपास एमआयडीसी बोरी पोलीस करीत असतांना . सदर तपासामध्ये दिनांक ०३/०६/२०२५ रोजी पोलीसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी १. निलेश नरेश भलावी, वय १९ वर्षे, गंगापुर, झोपडपट्टी हिंगणा,२. विजय संतोष यादव,वय २०, वार्ड क्र २ टाकळघाट हिंगणा तसेच टाकळघाट येथील २ विधीसंघर्ष ग्रस्त बालकांना ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्यांनी नमुद गुन्हा केल्याचे कबूल केले. पोलीसांनी आरोपी क्रं १ आणि २ यांना अटक केली आहे.

पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीकडुन चोरीस गेलेल्या लोखंडी प्लेट किंमती ८,०००/— मुद्देमाल असा एकूण ८,०००/— रूपये चा मुद्देमाल जप्त केला आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे—**

१) पोस्टे एमआयडीसी बोरी अप क्र २६१/२५ कलम ३०३ (२),३(५) भान्यासं

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने